# येशू कोण आहे?

**‘आम्ही आपली घोषणा करत नाही; तर ख्रिस्त येशू हा प्रभू आहे अशी आणि येशूप्रीत्यर्थ आम्ही तुमचे दास आहोत.....’ २ करिंथ. ४:५**

**पीटर वॉकर**

www.1peter1three.weebly.com

Transalted and designed by
Good Shepherd Media, Secunderabad 500 067
E-mail: printing@ombooks.org

# अनुक्रमणिका


परिचय . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 5

येशू कोण आहे? . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 7

येशूचा संदेश . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 9

विश्वास . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 11

संपत्ती . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 14

रक्त . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 16

आत्मा . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 18

आमंत्रण . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 20

नवीन जीवन . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 23

संदर्भित शास्त्रभाग . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 26

*ही पुस्तिका मी तुम्हा वाचकांना समर्पित करतो.*

*येशू ख्रिस्ताबद्दल तुम्हाला सांगण्यासाठी मला परवानगी दिल्याबद्दल धन्यवाद.*

*मी पवित्र शास्त्राचे कोणतेही औपचारिक शिक्षण घेतलेले नाही तसेच ईश्वरविज्ञानशास्त्रविषयक मुद्द्यांवर माझ्या भुमिकेबद्दल मी अगदी स्पष्ट नाही. तथापि, मी, येशूचा अनुयायी आहे आणि मला शास्त्रवचनांची आवड आहे. मला माझे काही विचार तुम्हाला सांगण्याची परवानगी द्या...*

# परिचय

**येशू कोण आहे असा प्रश्न जर तुम्हाला पडला असेल तर तुम्ही खरोखर एका अद्भूत ठिकाणी आहात!**

तुम्ही कदाचित देवावर रागावले असाल, किंवा यावेळी त्याच्यावर विश्वास ठेवत नसाल. किंवा, कदाचित तुम्ही देवावर विश्वास ठेवत असाल, परंतु दुखावले गेला असाल. कदाचित तुम्ही मुसलमान , हिंदू किंवा बौध्द किवा इतर कोणत्याही धर्माचे असाल. तुम्ही पूर्णपणे एका वेगळया ठिकाणी असाल ज्याच्याविषयी तुम्ही देखील निश्चित सांगू शकत नसाल...माझ्या मित्रांनो, तुम्ही कसेही आणि कोठेही असला तरी, पवित्र शास्त्राचा देव - पहिल्या पुस्तकापासून शेवटच्या पुस्तकापर्यंत - तुमचे स्वागत करत आहे. इतकेच नाही तर तुम्हाला अशी विनवणी करत आहे की तुम्ही विचारावे: **'येशू कोण आहे?'**

तुम्हाला पुष्कळ प्रश्न पडले असतील ज्यावर मी भाष्य करू शकत नाही आणि करणार नाही. खरोखर, या संक्षिप्त पुस्तिकेत मी फक्त एक येशूमध्ये 'विश्वासणारा' म्हणून तुमच्याकडे आलो आहे आणि माझे काही विचार तुम्हाला सांगणार आहे. माझा विश्वास, पवित्र शास्त्र आणि देवाचा आत्मा हे माझे स्त्रोत आहेत.

माझा असा विश्वास आहे की, पवित्र शास्त्र जे ६६ 'पुस्तकांचे' किंवा लिखाणांचे संकलन आहे ते देवाचा प्रेरित शब्द आहे. कोणत्याही चांगल्या किंवा 'खऱ्या' गोष्टीसारखे, पवित्र शास्त्राविषयी गैरसमज असू शकतात, त्याचा दुरुपयोग केला जाऊ शकतो, आणि त्याच्यावर अविश्वास प्रकट केला जाऊ शकतो. परंतु, पवित्र शास्त्राचा वापर करताना माणसांमध्ये तूटी असल्या तरीही, प्रामाणिकपणे

सत्याचा शोध घेणाऱ्यासाठी ते अजूनही देवाचा विश्वसनीय स्त्रोत आहे. हे शाळा न शिकलेल्या लोकांनी लिहिले आहे अशासाठी की ते वाचायला सोपे जावे. देवाने पवित्र शास्त्रात स्वतःला आमच्यापासून लपवलेले नाही; त्याने स्वतःला प्रकट केले आहे!

मी आता लगेच पुढील महत्वाच्या प्रश्नावर माझे विचार तुमच्या पुढे मांडणार आहे: **'येशू कोण आहे?'**

# येशू कोण आहे?

पवित्र शास्त्र आम्हाला शिकवते की, येशू ख्रिस्त - ज्याचा अर्थ *‘प्रभू वाचवतो’* - हा मनुष्याच्या रुपात देव आहे. देव मनुष्य होण्यासाठी स्वर्गातून खाली उतरला, यासाठी की आम्ही त्याला ‘वैयक्तिक’ रीतीने ओळखावे आणि देवाशी पूर्णपणे जोडले जावे.

येशू ‘देहरुपात’ देव आहे. आमच्या पापांची क्षमा करण्यासाठी आणि आम्हाला सार्वकालिक जीवन देण्यासाठी तो आला. हा ‘असा’ येशू आहे आणि ‘यासाठी’ तो आला.

## प्रकटीकरण

स्वतः प्रवित्र शास्त्र आम्हाला सांगते की हे एक अत्यंत गूढ असे सत्य आहे, जे समजणे अशक्य आहे. आम्हाला अजिबात त्याचे ‘आकलन’ होऊ शकत नाही – की आमचा उध्दार करण्यासाठी देव देहधारी झाला. आम्हाला हे ‘समजत’ नाही! हे आमच्यासाठी फार गहन आहे! होय, पवित्र शास्त्र सांगते की हे सत्य – इतके अद्भुत सत्य – आमच्या डोक्यात शिरण्यासाठी बनवले गेलेच नव्हते.

आम्हाला सांगितले आहे की देवाचे हे सत्य – येशू ख्रिस्त – हा *‘आत्मा आणि सत्य’* आहे आणि तो मनाने ‘समजून घेतल्याने’ नव्हे तर आमच्या आत्म्याला आणि अंतःकरणाला झालेल्या प्रकटीकरणाने आमच्याकडे येतो.

तुम्ही जर - माझ्या किंवा इतरांप्रमाणे - देवाला समजण्याचा प्रयत्न कराल, किंवा आपल्या मनात त्याला स्थान द्याल तर त्याला चालकाचे आसन देणे आमच्या आत्म्याला किंवा अंतःकरणाला फार अवधड जाईल.

पण तुम्हाला माहिती आहे, माझ्या मित्रांनो की, तुमच्यासाठी आता आयुष्यात जे काही मौल्यवान आहे - *मित्र, कुटुंब, आनंद, प्रेम, शांती, क्षमा, दया* - या गोष्टी मनाचे 'सत्य' नसून अंतःकरणाचे व आत्म्याचे सत्य आहेत. खरे तर, बऱ्याच बाबतीत आम्ही आमची मने, आमचा समजूतदारपणाला, 'हृदय सत्याला' किंवा नात्याला दुखापत किंवा नुकसान करू दिले आहे. **तुम्ही एखाद्यावेळी तुमच्या 'डोक्याला' तुमच्या अंतःकरणावर सत्ता गाजवू दिल्यामुळे नंतर त्याचा तुम्हाला पस्तावा झाला आहे का?** देव जर माझ्या संकुचित मनात किंवा माझ्या अनिश्चित 'समजशक्ती' मध्ये 'मावला' तर, तो खरोखर एक लहान देव असेल!

पवित्र शास्त्रात आम्हाला सांगण्यात आले आहे की, *'देव आत्मा आहे, आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे.'* येशू स्वतः त्याच्या वचनांबद्दल आणि प्रकटीकरणा बद्दल म्हणाला, *'माझे शब्द आत्मा आणि जीवन आहेत.'*

# येशूचा संदेश

येशूने लोकांना त्यांच्या 'विश्वासा'साठी आवाहन कसे केले हे मनोरंजक आहे. त्याने पैसा किंवा संपत्ती दिली नाही. तो ईश्वरविज्ञानशास्त्राविषयक प्रश्नांची उत्तरे देण्यासही आला नाही. तो अशा गोष्टी बोलला, *'कोणी तहानेला आहे का? त्याने माझ्याकडे यावे आणि प्यावे... माझ्यावर जो विश्वास ठेवतो त्यांच्यातून जिवंत पाण्याचे झरे वाहतील.'* येशूने विचारले की आम्ही 'तहानेले' आहोत का, आणि त्याने 'जिवंत पाणी' देण्याचे अभिवचन दिले. हे आमच्या रोजच्या जीवनातील अर्थव्यवस्थेत बसत नाही; हे आमच्या मनाला 'पटत' नाही. आणि तरीही ते आमच्या मनात खोलवर शिरते आणि अजून पाहिजे असल्याची आमची गरज भागवते असे वाटते.

## 'तुम्ही तहानेले आहात का ?' - हा येशूचा प्रश्न – तुमच्या मनाशी अनुकंपित होतो का?

किंवा, उदाहरणार्थ, येशू लोकसमुदायाकडे वळून म्हणाला, *'तुमच्यापैकी कोणी थकलेला आहे का?'* आणि नंतर त्याने एका वेगळ्या प्रकारच्या '*शांती*' चे अभिवचन दिले.

येशूने चमत्कार केले, पण त्याच्या चमत्कारांमागे एक विशिष्ट हेतू होता. एकदा येशू एका मोठ्या लोकसमुदायाला म्हणाला की, त्याला पापांची क्षमा करण्याचा अधिकार आहे हे आम्हा सर्वांना समजावे म्हणून त्याने चमत्कार केले. काही काळासाठी, काही लोकांचे जीवन सुखकर व्हावे *एवढ्यासाठी* त्याने चमत्कार केले नाहीत. आमच्या पापांची क्षमा करण्याचे आणि '*आमची नावे स्वर्गात*

*लिहून ठेवण्याचे*' सामर्थ्य त्याच्यामध्ये आहे हे आम्हाला समजावे यासाठी त्याने चमत्कार केले.

**तर मग, त्याचा संदेश काय होता? माझ्या अंतःकरणात हे 'जीवन', हा 'विसावा' हे 'जिवंत पाणी' मला कसे मिळू शकते?**

याच ठिकाणी येशूचा संदेश जिवंत होतो – अक्षरशः, आणि वैयक्तिकरित्या ...

येशू म्हणाला, *'मी दार आहे, माझ्याद्वारे जो कोणी आत येतो त्याचे तारण होईल.'* येशूने देवा*विषयी* शिकवले नाही; देवाची *ओळख* होण्यासाठी येशूने आम्हाला त्याच्याकडे बोलावले. तुमच्या आयुष्यात सध्या असलेली सर्वात गहन गोष्ट म्हणजे 'कोणी' ही आहे, काहीतरी किंवा एखादी संकल्पना नाही. तिच्याबद्दल एक मिनिट विचार करा. **दिवसाकाठी तुमच्यासाठी सर्वात अनमोल गोष्ट कोणती आहे?** मी तुम्हाला खात्री देतो की ती एक व्यक्ती असणार. देवही तसाच आहे. तुमच्यासाठी देवाविषयीचे सर्वात गहन सत्य - तो स्वतः आहे. मानवाची निर्मिती करण्यामागचा त्याचा हेतू हा होता की आम्हाला त्याला पाहता यावे, त्याला स्पर्श करता यावा आणि त्याची ओळख व्हावी. खरे पाहता, येशूला दिलेले एक नाव 'इम्मानुएल' असे आहे, ज्याचा अर्थ, '*आम्हा सन्निध देव* ' असा आहे. येशू - मनुष्यरुपात देव -- आमच्या सोबत रहाण्यासाठी आला, आता आणि सदासर्वकाळसाठी.

**?**

**देवाला वैयक्तिक रित्या ओळखावे असे तुम्हाला वाटते का?**

# ◇ विश्वास

येशू आम्हाला त्याच्यावर '*विश्वास*' ठेवण्याचे आव्हान देतो. तो प्रत्यक्षात लोकांमध्ये होता आणि ते त्याला 'पाहू' शकत होते तेव्हाचे हे त्याचे आमंत्रण होते. *ते जर त्याला पाहू शकत होते तर, त्याच्यावर 'विश्वास' ठेवण्यावर त्याने इतका भर का दिला?* 'विश्वास' या विषयाबद्दल दोन गोष्टी माझ्या डोळ्यासमोर येतात:

**1. खऱ्या मित्राचा तुमच्यावर विश्वास असतो!**

तुमचा एखादा असा 'तथाकथित' मित्र आहे का जो तुमच्या बाजूने उभा राहत नाही? तो तुम्हाला पाहतो, ओळखतो आणि तुम्ही जवळपास असताना तुम्हाला अभिवादन देखील करतो; या व्यक्तीचे तुमच्याशी आप्तसंबंध आहेत, पण त्याचा तुमच्यावर *'विश्वास'* नाही. त्याने त्याच्या हृदयातील काही भाग तुमच्यासाठी बंद करून ठेवलेला आहे. **अशा भावनांशी, नातेसंबंधांशी आणि अनुभवांशी तुम्ही संबंध ठेवू शकता का?**

येशू आला – देहरुपात देव असा – *'आमच्या सन्निध'* राहाण्यासाठी. त्याच्या इम्मानुएल ह्या नावाचा अर्थ, *'आम्हा सन्निध देव'* असा आहे.[1] आम्ही केवळ त्याची 'ओळख' करून घ्यावी अशी येशूची इच्छा नाही; त्याला तुमच्याशी प्रीतिचे, 'विश्वासाचे' संबंध जोडायचे आहेत. *एकमेकांवर प्रीति करणे म्हणजे खऱ्या मैत्रीची प्रेरणा होय.*

1 यशया ७:१४ / मत्तय १:२३

येशू म्हणाला, *'मी तुला माझा मित्र म्हटले आहे.'* येशू असे देखील म्हणाला की, आपल्या मित्राकरता प्राण द्यावा यापेक्षा एक मित्र अधिक मोठ्या प्रमाणात आपली प्रीति दर्शवू शकत नाही.[2]

## २. पाहणे म्हणजे विश्वास ठेवणे नाही !

येशू पृथ्वीवर असताना, अनेक लोकांनी त्याचे सामर्थ्य पाहिले, पण त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. माझ्यासारखीच, तुम्हाला देखील, कधी कधी अशी इच्छा होते का किंवा तुम्ही असे म्हणत देखील असाल की, *''जर मला येशूला प्रत्यक्षात 'पाहता' आले असते तर...''*

सत्य हे आहे की, - अनेकजण – बहुतेकजण – ज्यांनी त्याला देहरुपात पाहिले आणि त्याच्या चमत्कारांच्या सामर्थ्याचे साक्षी होते, ते प्रत्यक्षात त्याच्या विरोधात गेले. खरे तर, अनेकदा, त्याने जेंव्हा चमत्कार केले तेंव्हा, प्रत्यक्षात लोक त्याच्या *विरोधात* गेले. शेवटी, ज्यांनी त्याला 'पाहिले' तो *प्रत्येकजण* - ज्यांनी त्याचे ऐकले, त्याच्याबरोबर चालले, त्याने केलेल्या चिन्हांची आणि आश्चर्यकर्मांची मजा लुटली – त्यांनी एकतर त्याच्या विरुद्ध कारस्थाने केली किंवा त्याला सोडून गेले. ज्यांनी त्याला 'पाहिले' होते अशा प्रत्येकाच्या समक्षतेत तो दिवसाढवळ्या मारला गेला. म्हणून येशू आम्हाला त्याला 'पाहण्यासाठी' नव्हे तर त्याच्यावर 'विश्वास' आणि 'निष्ठा' ठेवण्यासाठी बोलावत आहे. जेंव्हा मानवाने त्याला पाहिले, तेंव्हा त्याने त्याला मारून टाकले. आम्ही आमच्या डोळयांना दिसत असलेल्या गोष्टींचे अनुसरण करण्यास – आणि त्याच्याशी निष्ठा राखण्यास स्वतःवर विश्वास ठेवू शकत नाही. काही काळापुरते आम्ही निष्ठावान राहू शकतो – जसे त्याचे शिष्य होते, पण कालांतराने आमचे डोळे, आमचे विचार, आणि आमची मने आम्हाला निराश करतील आणि आम्ही त्याच्या मागे जाऊ शकणार नाही. आणि आम्ही जे पाहिले आणि एकेकाळी जे आम्हाला आवडत होते त्याच्या विरुद्ध जाण्यास देखील आम्ही कमी करणार नाही.

येशू त्याचा शिष्य, थोमा याला म्हणाला, *'ज्यांनी मला न पाहता माझ्यावर विश्वास ठेवला ते धन्य.'*

---

2 योहान १५:१३-१५

येथे पृथ्वीवर, आमच्या मनाच्या चक्षुंनी आम्ही ‘पहावे’ आणि विश्वास ठेवावा अशी येशूची इच्छा आहे – म्हणजे, *स्वीकार करावा, अनुसरण करावे, आज्ञापालन करावे, उपासना करावी*. येशूला तुमच्याशी एका खऱ्या नातेसंबंधाची अपेक्षा आहे, एका मैत्रीची! एके दिवशी आम्ही वैभवात जाऊ, जिथे आपले डोळे शुद्ध असतील, आणि आपली अंतःकरणे स्थिर असतील आणि आम्ही त्याला ‘समोरासमोर’ पाहू पण आत्ता विश्वास ठेवण्याची गरज आहे.

**तुम्ही तुमच्या मनाच्या चक्षुंनी येशूला ‘पाहत’ आहात असे तुम्हाला वाटते का?**

# संपत्ती

**येशूला पाहणे आणि त्याच्यावर विश्वास ठेवणे इतके आवघड का आहे? संपूर्ण जग येशूविषयी का ऐकत नाही व विश्वास ठेवत नाही?**

मी जेंव्हा पवित्र शास्त्र वाचतो, तेंव्हा देवाची कार्यपद्धती पाहून मला आश्चर्य वाटते. काळाच्या सुरवातीपासून, जरी देवाने प्रत्येकावर सारखीच प्रीति केली तरी, काहीजण त्याला *'ओळखत'* होते आणि काहीजण ओळखत नव्हते. हे आम्हाला समजणे, त्याची उकल करणे, किंवा त्याचे स्पष्टीकरण देणे शक्य नाही – आणि शक्य होणारही नाही.

येशू पृथ्वीवर रहात होता, शिक्षण देत होता आणि चमत्कार करत होता त्यावेळी देखील अगदी अशीच परिस्थिती होती. काही लोक त्याच्या पाया पडून म्हणाले, *'तू परमेश्वर आहेस!'* काहींनी त्याला पाण्यात पाहिले, त्याचा तिरस्कार केला आणि त्याच्या अधिकाराला आव्हान दिले. असे कसे घडू शकते? एखाद्याला ख्रिस्तामध्ये देव दिसतो, आणि त्याच वेळी एखाद्याला ख्रिस्तामध्ये फक्त एक मनुष्य दिसतो. मला याचे स्पष्टीकरण देता येत नाही!

पण येशूच्या संपूर्ण जीवनात आणि शिक्षणात मला असे दिसले की, त्याने एका गहन आणि शांत मार्गाने स्वतःला प्रकट केले. *अगदी गहनपणे आणि शांतपणे!* जेंव्हा एखाद्या व्यक्तीने येशू जसा आहे तसे खऱ्या अर्थाने त्याला पाहिले – *'आम्हा सन्निध देव'* तेंव्हा ते प्रकटीकरण त्यांच्या हृदयापर्यंत पोचले, आणि त्यांच्यात सार्वकालिक बदल घडून आला. पण हे प्रकटीकरण इतके गहन आणि शुध्द आणि शांत आहे की, आमच्यापैकी बहुतेकांच्या लक्षात न येता ते आमच्या

नजरेतून निसटून जाते. जीवनाच्या पृष्ठभागावर असलेल्या अति गोंगाटामुळे आणि लालसेमुळे आमची मने इतकी विचलित होतात की, देवाविषयीच्या गहन गोष्टी आमच्या डोक्यावरून जातात.

या सत्याचे चित्र उभे करण्यासाठी येशूने एक अगदी छोटासा दाखला दिला. तो म्हणाला, *देवाचे राज्य एका शेतात पुरलेल्या संपत्तीसारखे आहे, जेव्हा एका मनुष्याला ती सापडली, तेंव्हा त्याने ती पुन्हा लपवून ठेवली, आणि त्याच्या आनंदात त्याने जाऊन आपले होते नव्हते ते सर्व विकून ते शेत विकत घेतले.'* [3]

**येशू ही संपत्ती तुम्हाला दिसू लागली आहे पण तुमच्या अवती भोवती असलेल्या अनेकांना ती दिसत नाही असे तुम्हाला वाटते का?**

3 मत्तय १३:४४

# रक्त

येशूची गोष्ट अविश्वसनीय आहे! आम्हाला असे सांगण्यात आले आहे की देव म्हणून, तो आम्हाला आमच्या पापापासून आमच्या *'डागांपासून'* मुक्त करण्यासाठी आला. तुम्हाला हे माहित आहे की, आमच्यातील अगदी खोलवरची पापे देखील रक्ताच्या खुणा मागे सोडतात. जेथे हिंसा आहे, छळ आहे, दुर्भाग्य आहे जेथे मृत्यू आहे तेथे रक्त, जे लोकांच्या जीवनाचा एकमेव स्त्रोत आहे ते सांडले जाते. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या, ते आपल्या सर्वांच्या हातावर आहे. आम्ही गुलामगिरी आणि छळवणूकीवर निर्माण केलेल्या जगात जगत आहोत आणि आम्ही सर्वांनी एकतर रक्तपात केला आहे किंवा चोरी केलेल्या वस्तूंचे सेवन केले आहे ज्यांच्यासाठी लोकांना त्यांचे रक्त आटवावे लागले आहे. हे एक दुःखद आणि अस्वस्थ करणारे सत्य आहे – परंतु, रक्तपात हा आपल्या जगातील अंधाराचे आणि देवापासून विभक्त होण्याचे मूळ कारण आहे.

म्हणून येशू येतो, आणि या पापापासून आणि अंधःकारापासून आम्हाला मुक्त करण्याची त्याची इच्छा आहे. आम्ही सहन केलेल्या अन्यायापासून आणि आम्ही केलेल्या दुष्कृत्यांपासून आम्हाला मुक्त करण्याची त्याची इच्छा आहे. प्रत्येक जीवात्म्याला, प्रत्येक अंतःकरणाला आणि आम्ही ज्या देशात रहातो त्या देशाला देखील निरोगी करून संजीवित करण्याची त्याची इच्छा आहे. आम्हाला असे सांगण्यात आले आहे की, येशूने आश्चर्यकारक अध्यात्मिक मार्गाने या उध्दाराचा आणि क्षमेचा मार्ग खुला केला: **येशूने आमचे पाप त्याच्या स्वतःच्या**

**व्यक्तीमध्ये आणि शरीरात घेतले आणि नंतर त्यासोबत तो मरण पावला.** पवित्र शास्त्रातील एक वचन असे म्हणते: *'तो आमच्यासाठी पाप झाला.'*[4]

येशूने माझे अपराध आणि लज्जा स्वतःवर घेतली आणि मग त्यासोबत तो मरण पावला. माझ्या पापासोबत मरण पावल्यानंतर, येशू मेलेल्यांतून उठला, पण माझे पाप त्याच्याबरोबर परत आले नाही. त्याने कबरेत पाप सोडून दिले, असे म्हणता येईल. येशूने माझे पाप स्वतःवर घेतले, त्यासोबत तो मरण पावला आणि माझ्यासाठी केवळ क्षमा आणि नवीन जीवन घेऊन परत आला.

पवित्र शास्तातील एक सामर्थ्यशाली वचन असे म्हणते, येशूचे रक्त आमच्या पापाच्या रक्तापेक्षा *'अधिक चांगला शब्द बोलते.'*

म्हणून, आम्ही जेंव्हा येशूवर विश्वास ठेवतो आणि त्याची क्षमा स्वीकारतो, तेव्हा त्याच्या बलिदानाच्या रक्ताबद्दल, *'येशूच्या रक्ता'* बद्दल आम्ही त्याचे आभार मानतो.

**तुम्हाला त्याच्या रक्ताने 'धुतले' जायचे आहे का?**

4 २ करथि. ५:२१

# आत्मा

येशू जिवंत आहे! तो शारीरिक आहे आणि तो स्वर्गात आहे. एक दिवस आम्ही त्याला *'समोरासमोर'* भेटणार आहोत.

परंतु जेव्हा येशू आपल्या शिष्यांना सांगत होता की तो लवकरच पृथ्वी सोडून स्वर्गात जाणार आहे, तेव्हा त्याने त्यांना सांगितले की त्यांनी या गोष्टीबद्दल आनंद करावा - दुःखी होऊ नये - कारण याचा अर्थ असा की *पवित्र आत्मा* त्यांच्याकडे येईल, आणि त्यांच्या "मध्ये" राहील.[5]

जेव्हा येशू पृथ्वीवर होता, तेंव्हा तो केवळ मनुष्य रूपात होता. जेंव्हा येशू एका गावात असायचा तेंव्हा त्याचा अर्थ असा की तो दुसऱ्या गावात नसायचा. जेंव्हा येशू एखाद्या माणसावर शांतीचा हात ठेवत असे म्हणजे तो दुसरया माणसावर शांतीचा हात ठेवू शकत नव्हता. तो माणसाच्या रूपात होता, आणि म्हणून आपल्यासारख्या जागा आणि काळाच्या बाबतीत मर्यादित होता.

जेव्हा येशू स्वर्गात गेला तेव्हा येशूचा आत्मा, *पवित्र आत्मा* आता *संपूर्ण* पृथ्वीवर ओतला गेला आहे. त्यामुळे आता येशू व्यक्तीशः आणि त्याची शांती एकाच वेळी प्रत्येक गावात आणि प्रत्येक व्यक्तीच्या अंत: करणात आणि घरात असू शकते. याचा अर्थ असा देखील होतो की येशू केवळ आमच्या सोबत चालू शकत होता असे नव्हे तर प्रत्यक्षात *आमच्यामध्ये* राहू शकत होता.

5 योहान १४:१७,२६,२८

आता येशूने पृथ्वीवर आपले कार्य पूर्ण केले आहे - मृत्यू होऊन आणि पुन्हा उठण्याचे, त्यामुळे आम्हाला क्षमा आणि सार्वकालिक जीवन देण्यासाठी - तो स्वर्गात शारीरिकरित्या रहातो. आम्ही आता पवित्र आत्म्याद्वारे त्याच्याशी संपर्क साधू शकतो.

आम्ही जेव्हा येशूवर विश्वास ठेवतो, तेंव्हा तो त्याच्या पवित्र आत्म्याद्वारे आमच्याकडे येतो, आणि आमच्या अंत: करणात, आमच्या जीवात, आमच्या आत्म्यात राहतो - 'आमच्या सन्निध देव'.

**तुम्हाला येशूवर विश्वास ठेवून त्याचा पवित्र आत्मा तुमच्या अंत: करणात आणि जीवनात घेण्याची इच्छा आहे का?**

# आमंत्रण

येशू म्हणाला, ‘मी दार आहे, आणि जो माझ्याद्वारे आत येतो त्याचे तारण होईल.’ (योहान १०:९).

**या क्षणी तुम्ही तुमच्या अंत: करणात आणि जीवनात येशूला आमंत्रित करू इच्छिता का?**

हा एक आध्यात्मिक निर्णय आहे, आणि येशूला आपले जीवन समर्पित केल्याने तुमच्या पापांची क्षमा केली जाईल आणि तुम्हाला अनंतकाळचे जीवन मिळेल. ज्या क्षणी तुम्ही येशूला ओळखता त्या क्षणी तुम्ही एका नवीन मार्गाला लागता आणि तो मार्ग ‘मध्यान्हापर्यंत उत्तरोत्तर वाढणाऱ्या उदयप्रकाशासारखा आहे.’ (नीतिसूत्रे ४:१८).

तुम्ही आता मृत्यूपासून जीवनापर्यंतचा पूल पार करू शकता आणि येशू ख्रिस्ताला ओळखू शकता. दोन महत्वाच्या गोष्टी ‘करायच्या’ आहेत. मी या गोष्टी खाली दिल्या आहेत आणि नंतर मी एक प्रार्थना लिहिली आहे ती वाचून तुम्ही अंत:करणापासून ‘प्रार्थना’ करू शकता:

**१. पापाबद्दल पश्चात्ताप:**

तुमच्या पापांबद्दल तुम्हाला पश्चाताप करावा लागेल. खरंच असे पाउल उचलणे कठीण आहे, पण येशू तसे करायला आम्हाला सांगत आहे. देवाच्या सहाय्याने तुम्ही तुमच्या जीवनातील पापापासून मागे फिराल असे तुम्हाला आत्ताच ठरवणे

आवश्यक आहे – पैशाची हाव, वासना, लोभ, बेईमानी, व्यसन, व्यभिचार, अश्लील साहित्य इत्यादी पासून.

पापाबद्दल पश्चाताप हा 'अंतःकरणाचा निर्णय' असतो आणि त्याचा परिणाम कालांतराने तुमच्या जीवनात आणि घरात दिसून आला पाहिजे. अशा काही गोष्टी असू शकतात ज्या आम्ही सोडून दिल्या पाहिजेत, किंवा त्याबद्दल कोणाशीतरी बोलले पाहिजे, अशा गोष्टी टाकून द्या, बंद करा, तुमच्यापासून दूर करा...तुम्ही जर आता पश्चात्ताप करून 'मागे फिरण्याचा' निर्णय घेतला असेल (यालाच 'पश्चात्ताप' म्हणतात) तर तुम्ही तुमचे पुढचे पाउल योग्य दिशेने उचलत आहात.

## २. येशू ख्रिस्तावर विश्वास:

आम्ही कोणत्याही वास्तविक नात्यामध्ये असलेल्या श्रद्धा आणि विश्वास यांचे महत्त्व आणि त्यातील सत्य यावर चर्चा केली. येशू आम्हाला त्याच्यावर 'विश्वास' ठेवण्यास सांगत आहे. येशू आम्हाला विश्वासाचे हे पाउल उचलण्यास व त्याच्यावरील विश्वासाची घोषणा करण्यास सांगत आहे. मी खाली एक प्रार्थना लिहिली आहे. ती तुम्ही स्वतः करू शकता. ही प्रार्थना तुमच्या अंत:करणातून आलेली आणि प्रामाणिकपणे केलेली असणे आवश्यक आहे.

तुम्ही तुमच्या पापाबद्दल पश्चात्ताप केला आणि येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला तर तो या क्षणी त्याचा पवित्र आत्मा तुमच्या अंत:करणात ठेवेल, तुमची पाप क्षमा करेल आणि तुमचे नाव स्वर्गात लिहील!

**प्रार्थनाः**

**प्रिय प्रभु येशू, माझ्यावर प्रीति केल्याबद्दल मी तुझा आभारी आहे. माझ्या पापासाठी मरण सोसल्याबद्दल मी तुझा आभारी आहे. मला क्षमा करून सार्वकालिकजीवन दिल्याबद्दल मी तुझा आभारी आहे.**

**आज मी माझ्या पापाबद्दल पश्चात्ताप करतो आणि माझा विश्वास आणि भरवसा तुझ्यावर ठेवतो. तू माझ्या पापांची क्षमा करावीस आणि माझ्यामध्ये तुझा पवित्र आत्मा ओतावास अशी मी तुला विनंती करतो. परमेश्वरा, मला क्षमा केल्याबद्दल धन्यवाद. प्रभु येशू, माझे तारण केल्याबद्दल धन्यवाद. मला इथून पुढे विश्वासू राहण्यास आणि मी तुला समोरासमोर बघेपर्यंत आयुष्यभर तुझे अनुसरण करण्यास साहाय्य कर. येशूच्या नावाने मी प्रार्थना करतो,**

**आमेन!**

# नवीन जीवन

तुम्ही येशूवरील विश्वासाचे हे पहिले पाऊल उचलले असेल तर, तुमचे तारण झाले आहे! तुमची क्षमा झाली आहे! तुम्ही एक 'नवीन उत्पत्ती' आहात. हे देवाचे सत्य आहे. हा येशूचा संदेश आहे.

नवा जन्म झालेले 'विश्वारणारे' म्हणून, तुम्ही दररोज पवित्र शास्त्राचे वाचन सुरू करणे आणि येशूबरोबर प्रार्थनेत काही मिनिटे घालवणे खरोखर अतिशय महत्वाचे आहे. तुम्ही एका चांगल्या, ख्रिस्ती मंडळीमध्ये सामील होणे देखील खरोखर महत्वाचे आहे, जेणेकरून तुम्ही इतर विश्वासणाऱ्यांच्या आधाराने विश्वासात वाढू शकाल.

तुमच्याकडे पवित्र शास्त्र नसेल तर, ते कोठे मिळते याचा शोध घेऊन ते विकत घ्यावे असा सल्ला मी तुम्हाला देईन. इंटरनेटवर किंवा पुस्तकांच्या दुकानात एकतर *'न्यू इंटरनॅशनल व्हर्शन'* (एनआयव्ही बायबल) किंवा *'इंग्लिश स्टँडर्ड बायबल'*(ईएसव्ही बायबल) चा शोध घ्या.

मी काय करतो की, मी रोज एक अध्याय वाचतो. असा निर्णय घेण्यासाठी सहाय्य करावे म्हणून येशू ख्रिस्ताला प्रार्थना व विनंती करा. तुमच्या ओळखीच्या आणि ज्याच्यावर तुमचा विश्वास आहे अशा एखाद्या ख्रिस्ती व्यक्तीला एखादे चांगले चर्च सुचवण्याची विनंती करा. आठवड्यातून एकदा चर्चला जाणे महत्वाचे आहे तसेच तो परमेश्वराला सादर केलेला "यज्ञ" आहे हे ध्यानात ठेवा. असे करण्यासाठी तुम्हाला तुमच्या वेळापत्रकातील आणि आर्थिक बाबींमधीलही काही गोष्टी बदलाव्या लागतील. *प्रभु यासाठी तुम्हाचा आदर करेल!*

मला तुमच्याकडून ऐकायला आवडेल! पुढील पानावरील माझ्या वेबसाइटवरून तुम्ही हे विश्वासाचे पाउल उचलले असेल तर, मला एक ईमेल पाठवून तसे कळवा. मी तुमच्या सोबत आनंद करीन आणि तुमच्यासाठी प्रार्थना करीन.

माझ्या भावा, माझ्या बहिणी, तुम्हाला माझा आशीर्वाद आहे! आम्ही प्रत्यक्षात किंवा कौटुंबिक पुनर्मिलनाच्या वेळी भेटेपर्यंत – येशूच्या नावामध्ये देव तुम्हाला आशीर्वाद देवो, तुमचे संरक्षण करो आणि तुमचे कल्याण करो!

अधिक माहितीसाठी खाली दिलेल्या माझ्या वेबसाईटला भेट द्या:

www.1peter1three.weebly.com

**‘परमेश्वर तुला आशीर्वाद देवो व तुम्हे रक्षण करो; परमेश्वर आपला मुखप्रकाश तुजवर पाडो व तुझ्यावर कृपा करो; परमेश्वर तुझ्याकडे प्रसन्नमुख करो आणि तुला शांती देवो’** गणना ६:२४-२६.

# संदर्भित शास्त्रभाग

**आम्ही त्याच्याकडे यावे म्हणून देव आम्हाला विनंती करतो :** २ करिंथ. ५:२०

**केवळ ख्रिस्त, त्याचे शास्त्रलेख आणि त्याच्या आत्म्याला जाणून घेणे:** १ करिंथ २:२-३

**पवित्र शास्त्राची प्रेरणा आणि त्याला अयोग्यप्रकारे हाताळणे:** इब्री ४:१२/ यिर्मया २९:१३ (मत्तय ४:१-११ आणि २ करिंथ. ४:२ देखील पाहा)

**शास्त्रलेखाचे अशिक्षित लेखक :** प्रे. कृ. ४:१३

**येशूचा अर्थ, 'प्रभू तारतो':** मत्तय १:२१

**येशू, मनुष्य रुपात देव :** यशया ७:१४/मत्तय १:२३; यशया ९:६; योहान १:१-५, ९,१४; योहान ८:५८/निर्गम ३:१४; योहान १०:३०; योहान १४:९; योहान ९:३८/ मत्तय १५:३३/निर्गम २०:५; योहान ५:४६; कलस्सै. १:१५-२०; इब्री. १:३; फिलिप्पै. २:६-११; जखऱ्या १४:९/प्रे. कृ. ४:१२; प्रकटी. १:१३-१८

**पाप क्षमा आणि सार्वकालिक जीवन देण्यामागचा येशूचा हेतू:** लूक ५:२४; योहान ११:२५-२६; योहान ४:१३-१४

**प्रकटीकरण , समजण्यास अशक्य ! :** योहान ६:३७, ६५; मत्तय १६:१६-१८; रोम. ११:३३-३६; यशया ५५:८-९; स्तोत्र ३६:९; २ करिंथ. ४:६; योहान ४:२४ आणि योहान ६:६३

**ख्रिस्तावर विश्वास:** योहान ७:३७; योहान ११:२५-२६; योहान ९:३५; मत्तय ११:२८-३०; लूक ५:२४; लूक १०:२०; योहान १०:९; योहान ५:३९-४०; योहान १५:१३-१५

**पाहणे म्हणजे विश्वास ठेवणे नाही:** योहान ११:४५,५३; मत्तय २६:५६; मार्क १५:२५ (सकाळी ९ वाजता) योहान २०:२९; २ करिंथ. ४:६; २ करिंथ. ५:७; १ योहान ३:२; १ करिंथ. १३:१२

**देव सर्वांवर सारखीच प्रीति करतो!:** २ पेत्र. ३:९;१ तीमथ्य. २:४; मत्तय १८:१४; योहान ३:१६;

**ख्रिस्ताची उपासना आणि ख्रिस्ताचा अव्हेर :** योहान ९:३८; मत्तय १४:३३; योहान १०:२०;२ करिंथ. ५:१६

**गहन आणि शांत प्रकटीकरण:** मत्तय १६:२०; मार्क १:२४,३४,४४; मार्क:४:११; यशया ६:९; २ करिंथ. ५:१६; स्तोत्र. ४२:७; मत्तय १३:४४

**ख्रिस्तामध्ये रक्त आणि स्वातंत्र्य :** यशया १:१८; स्तोत्र. २५:१५; २ करिंथ. ५:१७; गलती. २:२०; लूक ४:१८/यशया ६१:१; यशया ४२:३; २ इतिहास ७:१४; २ करिंथ. ५:२१; इब्री. ९:२२; इब्री. १२:२४

**आत्मा:** योहान १४:१-४; प्रकटी. १:१३-१८; १ करिंथ. १३:१२; योहान १४:१७,२६,२८

**आमंत्रण आणि नवीन जीवन:** इफिस. १:१३-१४; कलस्सै. १:२७; नीति. ४:१८; योहान ५:२४; मार्क १:१५; मत्तय ३:८; प्रे. कृ. ३:१९; रोम. १०:९; लूक १०:२०; २ करिंथ. ५:१७; इब्री. १०:२५; स्तोत्र १; यहोशवा १:९; इब्री. ४:१२/ २ तीमथ्य. ३:१६

**मागील कव्हर: येशू कोण आहे?**

हे पुस्तक पुढील वेबसाईटवर पीडीएफ स्वरूपात मोफत उपलब्ध आहे:

www.1peter1three.weebly.com